**डॉक्टरांना** बरोबर आणून आपले हाताची शुश्रुषा करण्याचा प्रयत्न केला. परंतु आपण त्या डॉक्टरास त्या पवित्र हाताचा लाभ दिला नाही. फक्त आपल्या "लीला" पहावयाची संधी दिलीत. आपले आवडते भक्त माधवराव देशपांडे उर्फ "**शाम्या**" यास आपणाबरोबर बोलण्याचा फार मोठा अधिकार होता, त्यालाही आपण सांगितलेत की:—

शाम्या! शाम्या! मी काय करू रे! त्या बाईच्या कडेवरची पोरगी, बाई भाता हालवीत असताना खाली रसरसलेल्या विस्तवात तिच्या कमरेवरून निसटली तिला सावरली रे! त्यात मी वावगे काय केले?

या हातावर औपचारिक "ईलाज" कितीही केलेत तरी "अंतर्यामी" बाबांना काहीच झाले नव्हते. या प्रसंगी महारोगी भक्तास (भागोजी शिंदे) आपले हातास लोणी लावून पट्टया बांधण्याची संधी दिलीत व आम्ही भक्त मंडळी नुसत्या "**आपल्या लीला**" पहात बसलो. खरोखरीच बाबा!

कुंती पाच पांडवाची आई ।।
अज्ञाता आणि वनवासा पाई ।।
कष्टली जरी अनंत आपाई ।।
प्रार्थी आपणची देवाते ।।

याची आठवण होते. नुसते दुःख पाहून ते कमी होत नाही. त्याचे सान्निध्यात **नाम स्मरण** करावे लागते. "**सतसंग**" असतो म्हणून चांगल्या गोष्टी करण्याकडे मन वळते व ज्यावेळी "**संत-संग**" **लाभतो** तेव्हा असे वाटते :–

मिळे सद्गती सद्गुरूचे कृपेने ।।
म्हणूनी करावा गुरू शिघ्रतेने ।।
मनापासूनी श्री गुरूपूजनाची ।।
धरा कामना शेवटी ती सुखाची ।।

हे जर समजले तर आपल्या पवित्र "लीला" समजण्यासाठी :–

गुरूच्यावरी पूर्ण श्रद्धा असावी ।।
अति नम्रतेनेच सेवा करावी ।।
गुरू दाविती मार्ग त्यानेच जावे ।।
असे त्यात कल्याण ध्यानी धरावे ।।

असा प्रयत्न झाल्यास "आपल्या लीला" पहावयास आम्हा भक्त मंडळींना एक प्रकारचा जो अत्यानंद वाटेल त्याचे वर्णन करण्यासाठी **शब्द** कमी पडतील. कारण हे **मन** असे सांगते की :–

अय जलवाये दील गुर में चाहू ।।
हर चीज मुकाबील आ जाये ।।
मंझील के लिये जो गांव चालू ।।

खुद सामने बाबा आ जाये ॥धृ॥
अय दील की ख्लीश तूं युंही चली ॥
चलता हूं "बाबाके" दरबारमें ॥
उस वख्त मुझे चौका देना ॥
जब महेफील रंगमें आजाये ॥१॥
आता है तो तूंफा आने दे ॥
खिस्ती का "साई" खुद है हाफीज ॥
मुश्कील तो नहीं इन मौजोमें ॥
बहेता हुवा साहील आ जाये ॥२॥
जहीद यह तमन्ना रखता है ॥
और कहता है "बाबाके" दरबारमें ॥
उल्फत का जीसे हो दावा ॥
वो मेरे मुकाबिल आ जाये ॥३॥

व म्हणूनच की काय – बाबा – आज आपली आमच्येमध्ये पुन्हा-हसते-खेळते-बोलते जीवंत बाबा अशी जरूरी आहे व यासाठीच आम्ही भक्तजन आपणास एकसारखे हाक मारीत आहोत :—

देई मज दर्शनाला—लावू नको वेळ बाबा ॥
खोटी आहे इथली माया—खोटा संसाराचा खेळ बाबा ॥
आलो दर्शनासी मज घेई ओळखून ॥
हाक हे मारिती तुला भक्त-जन ॥
तुला भेटण्याची मजला लागलीसे वेळ बाबा ॥१॥
पवित्र ही शिरडी—पवित्र द्वारकामाई ॥
रात्रंदीन बाबा—तुलाच बोलावी ॥
देवपणा सोड बाबा—लावू नको वेळ बाबा ॥२॥

व म्हणूनच आपण कृपावंत होऊन, आज या "अणुयुगात" आपले हाजरीची अत्यंत जरुरी आहे. कारण आम्हा भक्त मंडळीमध्ये पूर्वीसारखे आपण वावरावे की जेणे करून आम्ही भक्तमंडळी "श्रीसाईलीला" चा पुन्हा एकवेळ पवित्र लाभ घेऊ शकू.

"श्रीसाईलीला" अमर आहेत व अमर राहतील कारण या लीलात तो परम कृपाळू-दयाळू-मायाळू भगवंत वास करीत असल्याने त्याचा लाभ आम्हा भक्त मंडळीस मिळावा हीच आपले पवित्र चरणी मस्तक ठेवून विनंती आहे व म्हणूनच :—

समाधि सोडोनी या बाहेरी ॥
उठा उठा साई ॥
पिडीत जन आक्रंदती द्वारी ॥
आश्रय मागती पायी ॥

# श्री. काकासाहेब अवस्थी साईचरणी विलीन

● वयोवृद्ध साईभक्त एक गुणी आणि सज्जन थोर आणि आमचे सुहृद स्नेही श्री. नारायण पुरुषोत्तम उर्फ काकासाहेब अवस्थी यांचे मंगळवार दिनांक ३१ ऑगस्ट रोजी पुणे मुक्कामी देहावसान झाले हे वृत्त कळविताना आम्हास अतीव दुःख होत आहे. काकासाहेबांची व आमची भेट तीन वर्षांपूर्वी शिरडी मुक्कामी झाली तेव्हापासून तो शेवटपर्यंत त्यांचा आमचा स्नेह वृद्धिंगत होत राहिला. गेल्या वर्षी गणेश चतुर्थीला काकासाहेब आमच्या कुर्ला येथील निवासस्थानी श्रीगणेश दर्शनास येऊन गेले होते. त्यावेळी दिलखुलास मनाने आमच्या सर्व कुटुंबियांशी बोलले होते. गेल्या ऑगस्ट महिन्यात त्यांचे एक पत्र आले व 'श्रीसाई' या नावाची त्यांची कविता आमच्याकडे आली होती व ती लगेच आम्ही सप्टेंबर अंकात प्रसिद्ध केली. अंक व कात्रणे त्यांच्या पुण्यातील पत्त्यावर रवाना झाली खरी, पण ती कविता त्यांना वाचायला मिळाली की नाही कुणास ठाऊक! सप्टेंबर १९७६ च्या श्रीसाईलीलेत पान क्रमांक ४७ वर प्रसिद्ध केलेल्या आपल्या श्रीसाई या कवितेत अवस्थीकाका शेवटी म्हणतात—



**श्री. काकासाहेब अवस्थी**

जीर्ण झालेले शरीर, न जाणे केव्हा होईल अंत
प्रार्थितसे तुज देवा, चिरनिद्रा पदी द्यावी ॥५॥

यावरून मृत्यूची चाहुल त्यांना लागली होती असे दिसते. निधनसमयी काकांचे वय ७९ वर्षांचे होते. आपल्या तरुणपणात त्यांनी प्रत्यक्ष श्रीसाईबाबांना पाहिले होते. बाबांचे अगदी जवळून दर्शन एकदाच नव्हे तर अनेकदा त्यांनी घेतले होते व त्यावेळच्या बाबांच्या आठवणी सांगता सांगता ते सद्‌गदीत होऊन जात. त्यांचा कंठ अक्षरशः दाटून येई व नेत्रावाटे अश्रुधारा वाहात.

काका मूळचे मराठवाड्यातले. उस्मानाबाद जिल्ह्यात परांडा येथे त्यांचा जन्म १२ एप्रिल १८९७ रोजी (चैत्र शु. दशमी शके १८१८ झाला.) त्यांचे वडील श्री. पुरुषोत्तमपंत उज्जैनला सेशन जज्ज होते. गुरुदेव जस्टिस, एम्. बी. रेगे यांचे समवेत १९१५ साली काका अगदी पहिल्यांदा शिर्डीला गेले. त्यावेळी त्यांचे वय

१८ वर्षांचे होते. १९१५ सालापासून तो जवळजवळ १९७५ सालापर्यंत प्रत्येक वर्षी तर कित्येकदा वर्षातून दोनदा तिनदा त्यांनी आपल्या शिर्डीच्या वारीत खंड पाडला नाही. श्रीसाईलीलेच्या १९७५ च्या पहिल्या लेखक–कवी स्नेहसंमेलनास काका जातीने तीन दिवस हजर होते, व त्यांचा शुभाशीर्वाद संमेलनासारख्या उपक्रमाला लाभलेला आहे हे आम्ही आमचे सद्‌भाग्य समजतो. काकासाहेबांनी बाबांचेच जवळून दर्शन घेतले होते असे नव्हे तर बाबांच्या सभोवताली त्यावेळी वावरणाऱ्या, साई-सच्चरित्रामधे उल्लेख केलेल्या सर्व मंडळींनाही जवळून पाहिले होते. नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे, गोपाळराव बुटी, धुमाळ, दादासाहेब खापर्डे, दाभोळकर उर्फ हेमाडपंत, दासगणू महाराज, तात्या कोते पाटील, काकासाहेब महाजनी, बायजाबाई इ०चे दर्शन तर त्यांनी हरहमेशा घेतलेले होते. काकांच्या निधनाने बाबांच्या काळातला एक गुणी, साईप्रेमी अंतर्धान पावला आहे. श्रीसाईबाबा संस्थानशी त्यांचा दाट संबंध होता. काकांना चार पुत्र व दोन कन्यका एवढी अपत्य-संपदा आहे. त्यांचे थोरले चिरंजीव श्री. रघुनाथराव हे मुंबईस असिस्टंट कमिशनर या पदावर आहेत. त्यांचे दुसरे चिरंजीव श्री. सुभाष व श्री. शरद हे पण मुंबईस पोलिसखात्यात अधिकाराच्या पदावर आहेत. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे फक्त काकाच साईभक्त होते असे नव्हे तर त्यांचे सारे पुत्र, कन्या व सुना या पण साईभक्त आहेत. काकांच्या स्मृतीला आम्ही साश्रुनयनांनी श्रद्धांजली वाहात आहोत. समस्त साईभक्तांचा त्यांना त्रिवार प्रणाम !

---

दहिसरच्या श्री साई स्पिरीच्युअल सेंटरचे संचालक व वयोवृद्ध श्रीसाईभक्त श्री. बापूराव काकडे यांचे गेल्या २२ फेब्रुवारीस दुःखद निधन झाले. निधनापूर्वी काही दिवस अगोदर म्हणजे २६ जानेवारी रोजी आम्ही त्यांचेकडे दर्शनार्थ गेलो होतो. तेव्हा ते चांगले खडखडीत होते. ते इतक्या लौकर जातील याची अल्पशीसुद्धा शंका आम्हाला आली नाही. पण ईश्वरेच्छा ! ते गेले. हयात असताना त्यांनी आमचेकडे पाठविलेल्या दोन लेखांपैकी एक लेख लगेच आम्ही एप्रिल ७६ च्या अंकात प्रकाशित केला होता. राहिलेला लेख त्यांच्या इच्छेनुसार श्रीबाबांच्या या पुण्यतिथी अंकात पृष्ठ १८ वर प्रकाशित केला असून आम्ही सर्व श्रीसाईभक्त श्री काकडे महाराजांना आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

— का. संपादक

# वाचकांचा पत्रव्यवहार

श्री संपादक महाराज

सादर नमस्कार वि. वि.

साईलीला जुलै १९७६ ह्या मासिकाचे शेवटचे पानावर पार्श्वगायक श्री. जयवंत कुळकर्णी ह्यांचे गीत... साईस्मरण... "तुमच्या चरणाशी श्रीसाई" म्हणजेच हृदयाला पटणारी साक्षच होय ! अन् पुढील ओळींची सुरवात ... गत जन्माची असेल काही घडली पुण्याई म्हणोनी येणे होते तुमच्या चरणासी साई." ह्या ओळी वाचता वाचता किंवा आळविता आळविता माझी वा इतरांची हीच गत होत असेल का ? आणि त्याचे प्रात्यक्षिक म्हणजेच ... न काही ठरविता व ठरता हे माझे शरीर व मन ता. ११ जुलै ७६ ला श्री शिर्डीला होणाऱ्या श्री गुरुपौर्णिमा उत्सव, अभिषेक पूजा व श्रीसाईदर्शनाच्या आनंदात पहाटेपासून गीत ओळीनुसार साई दरबारात सेवा घडवीत होते. मग ते निष्ठा व सबूरीमुळे वा कशाने हे आपणच जाणावे.

विनित

साईसेवक **बापूसाहेब निरखे**

द्वारा त्रिमूर्ती सेवा सर्व्हीस

१५ नंदलालपुरा, इंदूर ४.

श्री. संपादक 'साईलीला' यांस

कृ. सा. न. वि. वि.

"साई थोर तुझे उपकार" ही सौ. प्रतिभा अशोक नागवेकर यांची कथा अतिशय आवडली. ही कथा वाचता वाचता माझे मन "साई प्रेमाने" भारावून गेले. खरोखरच सौ. प्रतिभा अशोक नागवेकर यांच्यावर साईबाबांनी खरोखरच उपकार केले आहेत, असे चित्र डोळ्यापुढे उभे राहाते आणि साईप्रेमाच्या उपकाराची आंतरीक ओढ मनात उत्पन्न होते. साई थोर तुझे उपकार – ही सौ. प्रतिभा अशोक नागवेकर यांची कथा फार "उत्कृष्ट" आहे. सौ. नागवेकरांसारख्या नवलेखिकांकडून प्रत्येक वाचकाच्या मनात याहीपेक्षा उत्कृष्ट साईविषयी लिहावे असे वाटते.

तसेच मधुभाई चेंदवणकर, शिरोडा गोवा, यांची 'तुझ्यावरी भरीभार' ही कविता १२ ओळींची असूनसुद्धा फार आवडली. तसेच इतर कथा, कविता छान आहेत. साईलीला या मासिकाद्वारे योगीराज श्रीसद्गुरु साईनाथ महाराजांविषयी चमत्कार, साक्षात्कार, उपकार, सामान्य जनतेसमोर जे लिहिलात, त्या सर्वांस माझे धन्यवाद !

वसंत रामचंद्र वाजे,

मुकेश मिल कंपौंड,

चाळ नं ५/२६ कुलाबा, ५.

श्री. संपादक 'साईलीला' यांस

स. न. वि. वि.

आपले मराठी मासिकाचा मी मागील बरेच वर्षापासून वाचक आहे. प्रत्येक महिन्यात प्रकाशित होणारे मासिक हे नावीन्यपूर्ण व मनाला मानसिक व बौद्धिक समाधान देणारे असते. विशेषतः त्यात प्रकाशित होणारी–गाठीभेटी, आमची श्रद्धास्थाने, उदींचा महिमा व संतांची चरित्रे ही सदरे फारच उद्बोधक वाटतात. श्री साईबाबांविषयीचे सामान्यज्ञान किती आहे ही माहिती संग्रही ठेवण्यासारखी वाटते.

आपण नुकतेच प्रत्येक महिन्याचे मुखपृष्ठावर ज्या साईबाबांच्या माहितीचे फोटो छापता ते आकर्षक व मन वेधून घेणारे आहेत. सुरवातीच्या व आजच्या मासिकात बरीच सुधारणा घडून आलेली आहे.

एकूण मासिक हे बाल, तरुण व आबालवृद्धांना बोधप्रद, उत्साहवर्धक आणि वाचण्यासारखे असून यामुळे दिवसेंदिवस वाचकवर्ग वाढत आहे. अशीच वाचकांचे मनात श्रद्धा निर्माण होऊन उत्तरोत्तर मासिकाचा खप जास्तीत जास्त व्हावा अशी मी अपेक्षा करतो. धन्यवाद.

सही/-

बी. एस. जोशी

(बाळासाहेब शंभूराव जोशी)

ना. डि. से. को–ऑप. बँक लि., नागपूर.

# श्रीसाईबाबांच्या पंचधातूंच्या मूर्ति करणारे कारागिर
# श्री. मनोहरपंत पितळे

● सदानंद चेंदवणकर



श्री. मनोहरपंत पितळे

महामुंबईत विलेपारले या नावाचा एक विभाग आहे. मुंबापुरीत विविध कार्य करणारी अनेक थोर मोठी मंडळी या विभागात रहातात. अगदी पॉश असा हा विभाग आहे. श्री साई-बाबांचे अनेक भक्त याच विभागात राहतात. द्वारकामाईत प्रत्यक्ष श्री बाबांना समोर बसवून त्यांची छबी आपल्या कुशल कुंचल्याने चितारणारे श्री. शामराव जयकर हे विलेपार-ल्याचेच. त्यांचे चिरंजीव आज याच विभा-गात रहातात. बाबांची भक्तीपर पदे म्हण-णारे कुशल गायक श्री. जयवंत कुलकर्णी पार-ल्यालाच रहातात, आणि बाबांची लोकप्रिय अशी पंचधातूंची सुंदर मूर्ति घडविणारे कसबी कारागिर श्री. मनोहर पितळे येथेच पिढीजात वास्तव्य करून आहेत. पारल्याला हनुमान मंदिराच्या शेवटच्या टोकाशी जिथे दत्तमंदिर आहे त्याच्या समोरच्याच परिसराला पितळेवाडी असे म्हणतात. ही वाडी या पितळे बंधूंचीच.

मूर्तिकार श्री. मनोहरपंत पितळे यांचा जन्म २६ ऑगष्ट १९३९ रोजी विले-पारले येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव घनःशाम व आईचे सत्यभामा. श्री. घनः शाम हे त्यावेळच्या जी. आय. पी. रेल्वेत अव्वल कारकून पदावर होते. ते परम साईभक्त होते. १९५१ साली ते निर्वतले. घनःशामपंतांचे वडील विष्णूपंत म्हणजे मनोहरपंतांचे आजोबा हे पण निष्ठावान साईभक्त. घनःशाम व विष्णूपंत या दोघां-नीही श्री साईबाबांचे दर्शन घेतले होते. इतकेच नव्हे तर साईबाबांच्या हाताने मिळालेली उदी अजून ही त्यांच्या घरी एका बाटलीत अगदी व्यवस्थितपणे ठेवण्यात आलेली आहे. कधी काळीच ही बाटली उघडली जाते आणि मग किंचितशा उदीचा वापर केला जातो आणि आश्चर्य असे की त्या तेवढ्या टीचभर उदीचा सुपरिणाम दिसून

येतो. मनोहरपंत जन्मले तेव्हा त्यांच्या तोंडात किंचितशी या बाटलीतील उदी टाकण्यात आली होती. यामुळेच की काय त्यांनी चांगले बाळसे धरले. पुढे शिकण्याकडे त्यांचा कल वळला. मनोहरपंतांचे सारे शिक्षण अगदी प्राथमिकपासून ते थेट मॅट्रिकपर्यंत पार्ले टिळक विद्यालयात झाले. १९६० साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. व इंटरपर्यंत जेमतेम शिक्षण घेऊन त्यांनी आपल्या व्यवसायात लक्ष घालण्यास सुरुवात केली. बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरचा आजचा त्यांचा व्यवसाय चांगलाच उर्जितावस्थेला आलेला आहे.

आपले वडील व आजोबा यांच्या साईभक्तीविषयी बोलताना श्री. मनोहरपंत सांगत होते – एकदा त्यांचे आजोबा विष्णूपंत शिर्डीस बाबांच्या दर्शनास गेले. जाताना त्यांनी बरोबर आंबे भेटीसाठी म्हणून नेले. बाबांनी त्या सर्व आंब्यांचा स्वीकार केला व मग तेच आंबे आपल्या सर्व भक्त मंडळींना वाटून टाकले. विष्णूपंत परत मुंबईस येताना त्यांच्या खिशात त्यावेळी १५ रु. होते. ते बाबांनी मागून घेतले. त्यांनी ते दिले. आणि आश्चर्य असे की शिरडी ते मुंबई पर्यंतच्या प्रवासात त्यांना कुणीही तिकीटाबद्दल विचारलेच नाही. अगदी अक्षरशः ते विना तिकीट आले. बाबांचा आशीर्वाद त्यांना लाभला होता म्हणूनच की काय त्यांना पुढे चांगला पैसा मिळत गेला. घरदार, वाडी इस्टेट त्यांनी पुढे केली व त्यांचीच परंपरा आज त्यांची नातवंडे चालवीत आहेत.

आपल्या बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरच्या व्यवसायाच्या जोडीलाच श्री. मनोहरपंत यांनी आणखीन एक छंद लावून घेतला आहे. तो छंद म्हणजे श्रीसाईसेवेचा. बाबांचे नाव घेतल्याशिवाय किंवा त्यांच्या तसबिरीला वंदन केल्याशिवाय त्यांचा दैनंदिन कार्यक्रम सुरूच होत नाही. श्रीबाबांची पंचधातूची मूर्ति आपण तयार करावी व ती घरोघरी जावी या शुद्ध व पवित्र विचारसरणीने प्रेरित होऊन त्यांनी गेल्या वर्षापासून बाबांची शिलाखंडावर अधिष्ठित अशी पंचधातूची व सुबक अशी मूर्ति तयार करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांनी अशी तयार केलेली अगदी पहिली मूर्ति, श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब, संस्थानच्या मुंबई कचेरीचे मुख्य अधिक्षक श्री. आपटे साहेब व साईलीलाचे का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांना प्रत्यक्ष दाखविली व या मूर्तीत काही फेरफार, बदल हवा का अशी विचारपूस केली होती. पण बाबांची मूर्तिच इतकी हुबेहूब त्यांनी बनविली की त्यात कोणत्याही प्रकारचा बदल नको असाच अभिप्राय त्यावेळी व्यक्त केला गेला. आपण तयार केलेली ही अगदी पहिली कलाकृती त्यांनी भक्तिभावाने शिरडीला नेली. तिथे समाधीपाशी नेऊन बाबांचे आशिष त्यांनी मागितले. त्यावेळीं त्यांच्या कुटुंबातली बहुतेक सर्व मंडळी तिथे हजर होती. या मूर्तिची आपल्या निवासस्थानी प्रतिष्ठापना, त्यांनी गुढीपाडव्याचे दिवशी समारंभपूर्वक केली; आणि मग त्यांनी पंचधातूच्या मूर्ती तयार करण्याचा उपक्रमच सुरू केला. तो इतका यशस्वी झाला की आज सबंध भारतातून त्यांच्याकडे मूर्तीची मागणी



**श्री. पितळे यांनी प्रतिष्ठापना केलेली पंचधातुची अगदी पहिली मूर्ती**

येत आहे. श्री. पितळे यांच्या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची मूर्ती ताम्हनात ठेवून तिला सुवासिक अत्तराने किंवा पंचामृताने स्नान अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला शिरपेच, मुकुट इ. अलंकार व फेटा किंवा इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ती अत्यंत शोभिवंत करता येते. बाबांची ही मूर्ती ९ इंच उंच व ५ इंच रुंद व ४ किलो वजनाची अशी असून ती अत्यंत मजबूत व शोभिवंत अशी आहे. या मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे पण त्यांनी तयार केले आहेत. बाबांची मूर्ती ठेवण्यासाठी लाकडी पाट ते विनामूल्य मूर्तीसोबत देतात. या मूर्तीला लहान मुलापासून सुद्धा फारसे जपावे लागत नाही. कारण ही मूर्तीअगदी अभंग अशी आहे. श्रीसाईंची अशी नित्यसेवा श्री. मनोहरपंत करीत आहेत.

श्री. मनोहरपंताचा विवाह १९७२ साली झाला. त्यांच्या सुशील व आतिथ्यशील पत्नी सौ. शैलाताई या पूर्वाश्रमीच्या नाईक घराण्यातल्या. त्या पूर्वी साईभक्त नव्हत्या. पण आता त्या संपूर्ण साईभक्त आहेत. अमोल व श्रद्धा अशी दोन अपत्ये त्यांना आहेत. त्यांचा छोटा अमोल तर कट्टर साईभक्त आहे त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तितके थोडेच. श्री. मनोहरपंतांच्या मातोश्री पण परम साईभक्त आहेत. श्री. पितळे यांना त्यांच्या कार्यात असेच सुयश लाभो ही प्रार्थना.

## साई भक्तांना सुवर्ण संधि

कित्येक साईभक्तांकडे श्रीबाबांचे संबंधीचे अनेक कार्यक्रम हरहमेशा होत असतात. काहीजणाकडे श्रीसाई सच्चरित्राच्या पोथीचे पारायण केले जाते व समाप्तीच्या दिवशी आदर भावयुक्त भजन–पूजन केले जाते. अशा सुप्रसंगी सुप्रसिद्ध भावगीत गायक व श्रीसाईभक्त श्री. श्रीराम सातर्डेकर हे साईबाबांच्या विविध गीतांचा श्रवणीय कार्यक्रम फक्त भक्तांना विनामूल्य देऊ इच्छितात याप्रसंगी त्यांच्या समोर जी दक्षिणाभेट जमेल ती सर्वच्या सर्व ते श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीला देणार आहेत. तरी सर्व साईभक्तांनी या अमूल्य संधीचा फायदा जरूर घ्यावा. गायक श्री. सातर्डेकर यांचा पत्ता—

श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर,<br>"विजित निवास", (दुसरा मजला) आर. एम्. भट हायस्कूल-जवळ, गोखले सोसायटी क्रॉस लेन, परळ, मुंबई १२

३२

# शिरडी-वृत्त–माहे ऑगस्ट सन १९७६

या महिन्यात श्रावण आल्याकारणाने श्रींच्या दर्शनासाठी भाविक साईभक्तांची गर्दी बरीच होती. आजूबाजूच्या नद्यांना पूर आल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती त्यामुळे रेल्वेमार्गाने बाहेर गावचे भक्तांना यावे लागले. सत्यनारायण पूजाही त्याच झाल्या. काही कलाकारानी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :** (१) संस्थानगवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. (२) विश्वनाथबुवा आळतेकर यांचे कीर्तन. (भिवंडी) (३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे याचे कीर्तन (शिरडी).

**प्रवचन :** (१) ह. भ. प. निवृत्तिराव पाटील गोंदकर याचे प्रवचन (शिरडी) (२) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाघचौरे याचे प्रवचन (शिरडी) (३) ह. भ. प. दादासाहेब ठाकरे, गुरुकुंज आश्रम अमरावती यांचे प्रवचन.

**भजन, वादन, गायननृत्य :** (१) ह. भ. प. गंगागिरी महाराज भजनमंडळी वैजापूर. (२) कु. विजया खडीकर इन्दोर. (३) ह. भ. प. बाळासाहेब मावळदकर पुणे. (४) सौ. रोहिणी फडकर नाशिक. (५) श्री. शिवाजी तु. धुमाळ मुंबई. (६) श्री. मधुकर तु. धुमाळ मुंबई. (७) श्री. चंद्रकान्त आ. मोरे मुंबई. (८) श्री. सोनबा शा. वाडेकर शिरडी. (९) सौ. सीतालक्ष्मी अय्यर पुणे. (१०) ह. भ. प. हनुमान प्रासादिक भजनी मंडळ खेड पुणे.

**स्वराज्य प्राप्तीदिन :** १५ ऑगस्ट रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे रिसीव्हर मा. श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम श्रीसाईबाबांचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. कार्यक्रमास संस्थान नोकरवर्ग, श्रीसाईनाथ हायस्कूल बँडपथक, शिक्षकवर्ग, होमगार्ड पथक, विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रतिष्ठित पाहुणे मंडळी उपस्थित होती. त्यांना चहापान देण्यात आले.

**मान्यवरांच्या भेटी :—**

(१) मा. श्री. एस. एम्. मराठे, चेअरमन, ब्युरो ऑफ इन्डस्ट्रीयल कॉस्ट ॲण्ड प्राईसेस न्यु दिल्ली

(२) मा. श्री. वसंतदादा पाटील, अध्यक्ष अखिल भारतीय साखरनियोजन मंडळ, महाराष्ट्र

(३) मा. श्री. शंकरराव मोहिते पाटील, अध्यक्ष, राज्य साखर कारखाना, महाराष्ट्र

(४) मा. श्री. शामकान्त मोहिनी आयुक्त महसूल विभाग पुणे.

(५) मा. श्री वसंतराव द्रविड माजी जिल्हाधिकारी अ. नगर.

(६) मा. श्री. विजयसिंग ठाकूर, जिल्हाधिकारी अ. नगर.

(७) मा. श्री. मुखोपाध्याय, कोकण डेव्हलपमेंट कार्पोरेशन मुंबई.

(८) मा. श्री. मिश्रा, चेअरमन, इलेक्ट्रीसिटी बोर्ड महाराष्ट्र.

(९) मा. श्री. एन. जे. मखीजानी, सिटी सिव्हील ॲण्ड सेशन जज्ज मुंबई

(१०) मा. श्री. ए. एन. बटय़ॉल रेव्हेन्यू सेक्रेटरी महाराष्ट्र.

# साओी-ध्यान-गान

( चाल—दत्त दिगंबर दैवत माझेप्रमाणे )

भक्तदेव श्रीबाबा साओी
भक्ताहांके धांवत येओी ॥ध्रु॥

१

डोओी दुपेटा, अंगी कुडतें,
स्वच्छ लुंगि ती कटीं शोभते,
रूप सावळें शांत सुमंगल
शुभ आशिर्वच शरणागति देओी ॥१॥

२

व्याधिग्रस्त, दुःखी, भक्त पुत्रि न कि,
कुणि भावार्थी साओिपदि आसक्त,
प्रेम आगळे, चिंतामुक्त करी,
सर्व जनांना पवित्र उदि देओी ॥२॥

३

देखुनि सोज्वळ रूप साओिचें,
मन आनंदे नाचु लागतें,
देहभानही हरपुनि जातें,
जपता साओी साओी ॥३॥

— सदाशिव विठ्ठल गर्दे
६७, शिवाजी पार्क, दादर २८.

# साई महिमा

साईनामका महिमा न्यारा । साईं तो है सबका प्यारा ॥ध्रु॥
साईनाममें गजबकी शक्ती
साईं तो है निर्मल भक्ती
ब्रह्मा विष्णू महेश की सिद्धी
साईनाम लेकर हो भाई पाओ तुम मुक्ती
भवसागर की नैया भी तो साईसे तरती
ऐसा तो है साईं, सबका दुलारा ।
पावन होवे उसका जीवन जो साईका प्यारा ॥

— सौ. प्रतिमा अशोक नागवेकर
बेस्ट क्वार्टर्स, ए/५
वडाळा बस डेपोजवळ, मुंबई ३१.

## पावन शिरडी

पावन शिरडी ! पावन शिरडी !!
भक्ति फुलांची ही तर परडी !
सुवास फुलांचा इथे दरवळतो
एकदांच जो भक्त हुंगितो
भक्तीचा आनंद मिळे त्या घडी घडी !
दूर दुःखाचा होई गलका
भवभारही होई हलका
सहजचि पडे जिवाची परमार्थावर उडी !
कुविचारांची गटार गंगा
स्पर्श न करि ती कधींच अंगा
नित्य वाहे ज्ञानसरिता भरूनिया दुथडी !
प्रभू साईचे दर्शन घेता
नाम मुखाने जपता जपता
मिळुनि मुक्ति पावन होत अपुली मानव कुडी !

– दत्ताराम आ. बारस्कर
१६ संतसेना महाराज मार्ग
खो. नं. ३४, ५ वा माळा,
गिरगाव-मुंबई ४००००४

## साईमाऊली

साई माऊली भगवती शारदे
नमोस्तुते नमोस्तुते
तुझ्या चरणी कमले फुलती
सहवासे ही हृदये विकसती
भाव अंतरीचे येथेच प्रसवती
ॐ कारे नादे भरला
जीव कळीला रंगे रंगला
ब्रह्मानंदे भान हरपला
साई नामे जीव अमृत प्याला.

– सौ. कलावती वसंतराव चव्हाण
बी/६ अंबाबाई मित्री निवास
सेनापती बापट मार्ग, दादर मुंबई-२८.

# एक आस

संत साईनाथा,
शिर्डीच्या समर्था,
तुजसी प्रार्थिता,
दोष जाती १
मागणे माझे रे
तुजसी एक रे
धरी तूं पोटी रे
बालकाशी २
नको देवा द्वेष
आणिक किल्मीष
नसावा तो शेष
हेचि मागे ३
रहावे माझेचि
मन हे सारेचि
अंती ते पायाशी
तुझ्या वारे ४
माझे रे मागणे
तुझ्यापायीं येणे
अन्य नसे जाणे
मजलागी ५
सांभाळूनि घ्यावे
सांभाळूनि न्यावे
वरदान द्यावे
बंडूशी बा ६
चरणी तुझिया
आस गुरुराया
नाम ते मुखी या
येवो देवा ७
हीच ती प्रार्थना
तुझ्या बा चरणा
करुनी गर्जना
वाही तुज ८

आर. बी. जोशी
सेंट्रल स्कूलजवळ, एअरफोर्स एरिया पुणे ३२.

# श्री गीतसाई

## निवडक "साईगीतायन"

### (गीत तिसरे)

[या तिसऱ्या गीतात मोक्षाच्या वाटेवरील त्या दिव्य वैकुंठपुरी शिरडीचे दर्शन घेऊया. या प्रेमयात्रेत आपण ज्ञानाची सीमा ओलांडून मुक्तीच्या प्रदेशात पाऊल टाकणार आहोत. ती पहा शिरडी आली! श्रीबाबांची दिव्य द्वारकापुरी इथला कण न् कण श्रीबाबांच्या स्मृतीने भरलेला आहे. चरित्रचमत्कार लीलांनी रंगला आहे. अमृत वचनांच्या सौगंधाने परिमळला आहे.]

शिरडी वैकुंठपुरी ! साईप्रभू श्याम !
ही यात्रा दिव्याची हेच चारी धाम ॥ ध्रु ॥
ही काशी रामेश्वर
भक्तिपेठ पंढरपुर
संसारी या असार हाच श्रमविराम ॥ १ ॥
खंडोबा सन्मुखसे
अजुन फकिररूप दिसे
अवतरले येथ प्रथम भक्त पूर्ण काम ॥ २ ॥
अजुन तपाच्या स्पर्शे
निंब मधुरता बरसे
परिमळते धूपासह श्रीगुरुचे नाम ॥ ३ ॥
येथ समाधी मंधुनी
अजुन उठे करुणाध्वनि
तुडविते ये जडसीमा चेतना असीम ! ॥ ४ ॥
द्वारकेत नटनागर
चक्रपाणि श्रीगिरिधर
येथ प्रभू चरणावर लाख हे प्रमाण ॥ ५ ॥
हे मंगल क्षेत्र परम
हे अखंड प्रेमधाम
गोदावरि तीरातुन झरे दिव्य प्रेम ॥ ६ ॥
ही यात्रा दिव्याची
ही सीमा ज्ञानाची
मोक्षाचा पंथराज, हे शरण्य धाम ॥ ७ ॥

—चकोर आजगांवकर

# "विसरू कशी मी श्रीबाबाला"

ज्या नामस्मरणे उद्धार झाला । मनोविकार समूळ नष्ट झाला ।
साक्षात् परमात्मा मज भेटला । विसरू कशी मी श्रीबाबाला ॥ १ ॥
सुमार्ग ज्याने मजला दाविला । उदी प्रभावे भ्रम निवाला ।
तो दीन कैवारी शिर्डीस उदेला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ २ ॥
चराचर व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला त्याची ।
शिर्डीस ज्याचा रहिवास झाला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ३ ॥
जो सर्वदा गुप्त जनात वागे । आपुल्या भक्ता निजबोध सांगे ।
भाव भक्तिचा राहि भुकेला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ४ ॥
अनंत माझे अपराध कोटी । शून्य मानूनी घातले सर्व पोटी ।
मज उद्धारिता अंती जो श्रमला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ५ ॥
नाही मज करवी पूजन झाले । तथापि तेणे मज उद्धारिले ।
आता तरी प्राण अर्पिन त्याला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ६ ॥
माझा अहंभाव वसे जो शरिरी । तथापि तो सद्‌गुरु त्याते अंगिकारी ।
नाही मनी भेदभाव ज्याला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ७ ॥
आता कसे हे उपकार फेडू ? हा देह ओवाळूनी दूर सोडू ।
मी एकनिष्ठे प्रणिपात केला । विसरू कशी मी श्री बाबाला ॥ ८ ॥

कु. शालिनी सदाशिव देशपांडे,
११ रामदास कॉलनी,
जिल्हापेठ, जळगाव.

# आलो तुझिया द्वारा

आहे निरंतर – बाबा तुझी ओढी ।
नाम तुझे गोड – साई नाथा ॥ १ ॥

दुःखी भक्त – भजी लागे ।
तोच साई बाबा – म्हणविला ॥ २ ॥

उतरता शिर्डी – पाहू डोळा ।
नयन रम्य – पवित्र हे ठिकाण ॥ ३ ॥

दिसता शिखर – कला कुसरीचे ।
भाव अंतरीचे – उभारले ॥ ४ ॥

पाहिला लिंब वृक्ष – माउलीचा ।
उदी जळी – जाळी भावनेचा ॥
मंदिर हे सुंदर – साईचे स्थान ।
येती भक्त येथे – नाही जातपात ॥ ५ ॥

नाही तेथे वर – नाही दुजा भाव ।
निर्मिले हे स्थान – कुणासाठी बाबा ॥
अमूल्य हा ठेवा – आम्हा साठी ॥ ६ ॥

तुझीच सुमने – वाहतो तुलाच ।
चाले नैवेद्य गलेफ – तुला सुद्धा ॥
अहंकारी मन – होई कधी शुद्ध ।
असाचि निर्बुद्ध – कुठवरी ॥ ७ ॥

स्वीकारले तुज – मानियले पूज्य ।
स्वागतास सज्ज – साईच्या ॥
अचपळ मन – आवरू मी कसा ।
हाती दग जसा – आवळावा ॥ ८ ॥

नाही ओळखीले – तुझे मी रूप ।
मन हे द्वाड – मानसाचे ॥
म्हणोनिया आज – आलो तुझ्या द्वारी ।
साई नाथा उद्धरी – देवा मज ॥ ९ ॥

राम आसेकर,
एम. सी. इन्सपेक्टर,
जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख उस्मानाबाद.

# ओवी गाईन साईनाथा

पहिली माझी ओंवी गाईन साईनाथा ।
चुकतील साऱ्या व्यथा संसाराच्या ॥ १ ॥

दुसरी माझी ओंवी दोन्ही कर जोडून ।
सोनियाच्या कळसाला करिते वंदन ॥ २ ॥

तिसरी माझी ओंवी जाईन शिरडीक्षेत्रीं ।
पाहीन तुझी मूर्ति साईदेवा ॥ ३ ॥

चवथी माझी ओंवी चारी दिशा उजळल्या ।
निंब वृक्षाखालीं उभा साईदेव ॥ ४ ॥

पांचवी माझी ओवी पाणी ओती पणत्यांत ।
तेलाविण दिवे जळती सारी रात ॥ ५ ॥

सहावी माझी ओंवी षड्रिपूंचा व्हावा नाश ।
धुनी जळते रात्रंदीस मशिदीमध्यें ॥ ६ ॥

सातवी माझी ओंवी गहूं घेऊनी सुपांत ।
दळती दळण कराया रोगाचे निवारण ॥ ७ ॥

आठवी माझी ओंवी येतसे आठवण ।
डोई घेऊनी पाटी हिंडसी रानोवन ।
शोधुनी देवराया घालसी भाकर ।
बाईजाबाई तुझा कसा पडेल विसर ॥ ८ ॥

नववी माझी ओंवी नऊ रुपये दिधले ।
नवविधा भक्तिचे गुज लक्ष्मीला सांगितले ।
साईमाऊलीनें लक्ष्मीला सांगितले ॥ ९ ॥

—सौ. सुशीलाबाई हजारे
मालेगांव कॅम्प, मु. पो. मालेगांव, जि. नाशिक

५१

# " जीव शिर्डीत रमला "

झाले उल्हासित चित्त
रंग रंगले भजनी
आले पावित्र्य भरून
सूर्य आकाशी मध्यान्ही

सूर्य आकाशी माध्यान्ही
दृष्टी आगळी अंतरी
साई कृपेचा भुकेला
जीव भजनी लागला

जीव भजनी लागला
जीव जीवाला जडला
साईकृपेची लीळा
जीव शिर्डीत रमला

के. एस. देशमुख
२३ स्वानंद सोसायटी,
मु. पो. वसमतनगर, जि. परभणी

# शिर्डी माझे माहेर

शिर्डी हेचि माझे माहेर । साई बाबा माझा आधार
श्री सद्‌गुरू साईबाबा । हेच माझे मायबाप ।।

ह्यांचे वाचोनि मज नाही कोणी । कलियुगात घेतला अवतार
कैसा अवतार नाही हिंतें कळत । साक्षात् आहेत ईश्वर ।।

जग झाले आंधळे । त्याशी नाही अनुभव ।।
भक्तीचा करावा भार । तेव्हा कळेल सार ।।

ऐसी माऊली नाही मिळणार । करा साधना जन्मभर ।।
'कमल' म्हणे साई माऊली । करा भक्तांवरी साऊली ।।

सौ. कमल रघुनाथ खांडभोर
५७० दत्तवाडी, पुणे–३०

# "पूर्व पुण्य...."

विष पचविलें
शिव शंकराने
श्रीराम जपाने मनोमनीं...

कलियुगीं ध्यावे
नाम सत्यसाई
निर्विष ते होई भवदुःख...

सत्य चिरंतन
असतां निर्गुण
झालासे सगुण दीनासाठी...

चर्मचक्षू पाही
साक्षात् चिन्मय
रूप निरामय सत्यदेव...

कर्णरंध्र घेती
अमृताचे बोल
लाभ अनमोल सत्यवाणी...

जातो अहंभाव
पदीं लीन माथा
प्रभो साईनाथा कृपा असो...

पूर्व पुण्य फळ
चित्तीं साई ध्यान
घडावे दर्शन एकवेळा...

देहा ईशस्पर्श
जन्म उद्धरिला
भक्तिभाव अर्पिला साईसत्य...

—शशिकला साळगांवकर
मुक्तानिवास, १५५, ब,
नवी पेठ, सोलापूर

५३

# शिरडी नंदनवन

[ जाति अक्रुर ]

शिरडी क्षेत्र हे, क्षेत्र अतिपावन
गोदातीरीचें दुजे नंदनवन ॥१॥
इथे खेळला, खेळला श्रीगिरीधारी
साईनामे निर्मळ तरुखाली ॥२॥
तैसे तेवले, तेवले दिप अगणित
तेलाविण जळाने जाण ॥३॥
इथे दाविले, दाविले श्रीरामरूप
असे अयोद्धेचे रूप ॥४॥
इथे प्रकटले, प्रकटले पंढरीनाथ
पावन पंढरपूर भक्तांस ॥५॥
चला जाऊया, जाऊया दोन क्षण
वेचू जीवनी अमृतकण ॥६॥
दर्शन घेऊया, घेऊया बाबांचे
उजळेल भाग्य सुनयनांचे ॥७॥
जाऊ शरण, शरण साईरायांना
रसआनंदे रोमांचित ममकाया ॥८॥
जपू नाम ते, नाम अतिमधुर
कृपाहस्त राहील आमुचेवर ॥९॥
अर्पू सुमने ही, सुमने दोंही करांनी
संपत्तिप्रकाश प्रकटे संसारभुवनी ॥१०॥
वाहू अवघे, अवघे जीवन प्रभुचरणी
सौख्यनिर्झर खळाळेल द्वारी ॥११॥

श्रीधर सिद्धेश्वर प्रभुणे
१७८, यादोगोपाळ पेठ, सातारा

# सद्गुरु श्रीसाईनाथाचा धावा

येई लौकरी बा गुरुवर्या ॥ धाव साईराया ॥
भव सागर संसारी ॥ बुडतो मी सर्व परिने स्वामी ॥
कामक्रोधादिक टपले हे ॥ ग्रासाया मज पाही ॥
शक्ती नसे मज आतां ॥ सांगाया तुज पायी
येई लौकरी बा गु० ॥ध्रु०१॥

येवूनि नर देही मी कांहि ॥ निजहीत केले नाहि ॥
बाल्य अवस्था ॥ क्रीडेत घालविली गुरुनाथा ॥
यौवनं मज भरि ॥ बहुमत न कळे युक्ता युक्त ॥
रात्रंदिन झटली गुरुवर्या ॥ विषय सुख सेवां या ॥
येई लौकरी बा गुरु ॥ध्रु०२॥

छळलो बहुसंता भगवंता ॥ अंतरी पडली अहंता ॥
पडता कानी ती ईशकथा ॥ शुळ उठे मम माथा ॥
अज्ञान अंध झालो ॥ इहपरी सौख्या मुकलो ॥
आली घोर जरा ग्रासाया जन्मोनी झालो वाया
येई लौकरी बा गुरु ॥ ध्रु०३॥

अधमाधम मी मोठा । महापापी मजवरी करुणा ओवी ॥
तुजविण कोणाचा करू धावा न करी माझा हेवा ॥
पतित सी तारक हे ॥ ब्रीद असे तुझे हे गुरुवर्या ॥
साईनाथा मजलावी तव पाया ॥ घे पदरी राजाया ॥
येई लौकरी बा गुरू ॥ ध्रु०४॥

एन. आर. देशपांडे
पो. येल्लारेड्डी,
जि. निजामाबाद, आंध्र प्रदेश

५८

# श्रीसाईलीला—

## लेखक—कवी स्नेहसंमेलन—तिसरे—१९७७

येत्या जानेवारीत शिरडी येथे थाटात साजरे होणार. विशेष माहिती श्रीसाईलीलेच्या पुढील अंकी.

## शिर्डीतील कर्मचारीवर्गाची पारायणे

यंदाचे श्रावणमासानिमित्त श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी येथील कर्मचारी वर्गाने " शांती निवास " इमारतीमध्ये मे० रिसिव्हर साहेब यांचे परवानगीने दि० २९।७।७६ ते १६।८।७६ पर्यंत खालीप्रमाणे पारायणे केली व दि.१६।८।७६ रोजी " महासत्यनारायण पूजा " करून त्याची सांगता केली.

| | |
|---|---|
| (१) श्रीसाई सच्चरित्र | १५ |
| (२) श्रीगुरुलीलामृत | ३ |
| (३) श्रीगुरुचरित्र | ७ |
| (४) श्रीगजानन विजय | ११ |
| (५) श्रीशिवलीलामृत | ३ |
| (६) श्रीएकनाथी भागवत | १ |
| (७) श्रीज्ञानेश्वरी | १ |
| | ४१ |

अशी एकुण एक्केचाळीस पारायणे केली आहेत. सदर कार्यक्रमात सर्व संस्थान नोकरांनी भाग घेतला होता. सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्याकरिता संस्थानचे वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

सदर कार्यक्रमाचे समाप्तीचे वेळी एका साईभक्ताने " एकटी " हा चित्रपट दाखविला व कार्यक्रमाला शोभा आणली.

# श्रीसाईबाबा पुण्यतिथी महोत्सव

दरवर्षीप्रमाणे श्रीसाईबाबांचा ५८ वा पुण्यतिथी महोत्सव श्री क्षेत्र शिर्डी येथे [illegible]ला शुक्रवार ता. १ ऑक्टोबर पासून सुरू होईल व सोमवार ता. ४ ऑक्टोबर रोजी [illegible]त्सवाची समाप्ती होईल. सर्व साईभक्तांनी उत्सव प्रसंगी हजर राहून सर्व प्रकारचे [illegible]पूर्ण सहकार्य द्यावे अशी विनंती आहे.

## ग्रंथभेटीचा स्वीकार

# श्रीसाई महिमामृत

[ लेखक-प्रकाशक — श्री. मधुकर भीमाशंकर देशपांडे, ३३ कसबा पेठ, पुणे ११ पृष्ठे १०८, किंमत पाच रुपये. ]

पुण्यातील एक मेहनती लेखक व पत्रकार श्री. मधुकरराव देशपांडे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. श्रीबाबांचे ओवीबद्ध असे चरित्र लिहिण्याचा संकल्प त्यांनी चौदा वर्षापूर्वी केला होता तो या सुंदर वाचनीय पोथीमुळे पूर्ण झाला आहे. चिकाटीने त्यानी हे कार्य केले याबद्दल ते खरोखरीच कौतुकास पात्र आहेत. या ओवीबद्ध चरित्रास चांदभाई व बाबा यांच्या शिर्डी भेटीपासून सुरुवात करण्यात आली असून शिर्डीतील बाबांच्या सर्व त्या ठळक घटनांच्या सुटसुटीत अशा ओव्या गुंफण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे महिमामृत वाचनीय व श्रवणीय असेच आहे. या ग्रंथाचे वाचन केल्यामुळे स्वतः लेखकाच्या अनेक विवंचना अक्षरशः नाहिशा झाल्या. तशा इतर साईभक्तांच्या पण होवोत व त्या दूर करण्यासाठी साईभक्तांनी हा अपूर्व असा ग्रंथ निदान एकदा तरी पठण करून संग्रही बाळगावा अशी शिफारस आम्ही करतो.

× × ×

# गाडगे बाबा

[ लेखक : प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, प्रकाशक : श्रीगाडगे महाराज मिशन, नाशिक, किंमत दहा रुपये : पाने ११० ]

संत श्रीगाडगे महाराज यांच्या जन्मशाब्दि वर्षानिमित्य महोत्सव महाराष्ट्रात सर्वत्र शासकीय पातळीवरून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्य श्रीगाडगेबाबांच्या चरित्राची ही रंगीन, सुंदर सचित्र आवृत्ती प्रकाशित करण्यात आली असून तिचा प्रकाशन समारंभ भारताचे परराष्ट्र मंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे शुभहस्ते नुकताच झाला. या पुस्तकात श्रीगाडगेबाबांच्या जीवनकार्याविषयी संपूर्ण माहिती असून ठिकठिकाणी प्रसंगोचित दुर्मिळ छायाचित्रेही आहेत. त्याप्रमाणे पुस्तकात श्रीबाबांच्या सामाजिक कार्याचा विस्तार; व त्यांच्या जीवनातील प्रमुख घटना व गाडगे-महाराज मिशनची विविध कार्ये यांचीही संग्राह्य माहिती दिली आहे. बाबांचे अंतिम दर्शनाचे व त्यांच्या अंगठ्याचा ठसा ही चित्रे भाविकांना निश्चित संग्राह्य वाटतील. मुखपृष्ठावरील सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी चितारलेले गाडगेमहाराजांचे दुरंगी पूर्णाकृति चित्र अप्रतिम अन् मोहक आहे.

५४

# माधुकरी

[प्रकाशक – श्री. गुणवंतराव बाजीराव चराटे, श्री गाडगेबाबा प्रकाशन समिती ६, त्रिभुवन रोड विद्यार्थी भुवन, मुं. ४००००४, किं. १.२५, पृष्ठे ४०]

ज्यांनी आपली सुमारे ४८ वर्षे जनताजनार्दनाच्या सेवेत घालविली, असे थोर निष्काम पुण्यशील श्रीसंत गाडगे महाराज यांच्या जीवनापासून स्फूर्ति घेऊन महाराष्ट्रातील अनेक कवि महाशयांनी आपल्या भावमधुर व ओजस्वी लेखणीने गीतरुपी "माधुकरी" श्रीबाबांना आनंदाने अर्पण केली. "माधुकरी" हा त्यातीलच निवडक गीतांचा संपादित संग्रह प्रकाशन समितीने जन्मशताब्दि वर्षात प्रकाशित केलेला आहे. हे खरोखरच अभिमानास्पद आहे. ह्या छोटेखानी पुस्तकात श्री गाडगेबाबांची गौरवपर गीते, कविता, भजने, अभंग तसेच बाबांचे बोल, संदेश, शायरी, बाबांचा अमूल्य संदेश, विविधेतर प्रादेशिक नावे इ. इ. ची संग्राह्य जोड आहे. मुखपृष्ठावर श्रीबाबांचे रंगीत चित्र आहे.

# मुखपृष्ठावरील छायाचित्रासंबंधी

या अंकावर छापलेले श्रीसाईबाबांचे अगदी दुर्मिळ व प्रथमच छापत असलेले असे चित्र इंदूरहून साईसेवक श्री. गजानन कृष्णराव उर्फ बापूसाहेब निरखे, त्रिमूर्ती सेवा सर्विस, १५ नंदलालपुरा इंदूर यांनी आम्हांस प्रत्यक्ष भेटून भेटीदाखल दिलेले आहे. बाबा हयात असतांना द्वारकामाईत टिपलेले हे चित्र इंदूरचे एक सत्पुरुष श्री रुमालवाले बाबा हरसिद्धी मंदिराचे जवळ यांचेजवळ पिवळट जुनाट अवस्थेत होते. श्री रुमालवाले बाबा यांच्या दर्शनास गेलेल्या श्री. धोंडो विनायक पाठक, १७ गोधा कॉलनी इंदूर यांनी ते मिळवून इंदूरचे एक नामवंत छायाचित्रकार श्री. बाळ पंडित, महात्मा गांधी मार्ग यांचेकडून मोठ्या मेहनतीने सुस्थितीत आणले. श्री. पाठक यांनी ते छायाचित्र आपले स्नेही श्री. उपासनी यांना दिले व उपासनींनी ते १९६५ साली आपले स्नेही श्री. बापूसाहेब निरखे यांना दिले व श्री. बापूसाहेबांना काय करंट लागला कुणास ठाऊक ते आमचे भेटीसाठी तडक शिर्डीस गेले पण तिथे आम्ही भेटलो नाही म्हणून मुंबईस आमची भेट घेऊन हे चित्र श्रीसाईलीलेवर छापून त्याच्या प्रती निदान भक्तांना द्या अशी विनंती केली व त्यानुसार हे चित्र प्रसिद्ध करीत आहोत.

—का. संपादक

# श्रीसाईलीला— बहारदार दिवाळी अंक

● श्रीसाई भक्तांच्या विविध साई अनुभवांनी भरगच्च असा सुमारे शंभर पानांचा खास अंक ऐन दिपावलीत वाचकांच्या भेटीस येत आहे.

● गतवर्षीच्या दिवाळी अंकाची भक्तांनी खूप लांबून लांबून पत्रे पाठवून मागणी केली पण आम्ही एकाचीही मागणी पुरवू शकलो नाही कारण अंक प्रसिद्ध झाला आणि काय आश्चर्य ! लगेच तो हातोहात संपला.

● वर्गणीदारांना हा अंक नेहमीच्याच वर्गणीत मिळेल इतरांनी दीड रुपया (ट. खर्चासह) म. ऑ. ने मुंबई कार्यालयात पाठवून आपला अंक राखून ठेवावा. म. ऑ. कूपनमध्ये साईलीला 'दिवाळी अंकासाठी' असे लिहून संपूर्ण नाव, पत्ता जरूर लिहावा.

● या खास अंकात कविता अजिबात प्रसिद्ध केल्या जाणार नाहीत.

● **मुखपृष्ठावर श्रीसाईबाबांचे बहुरंगी संग्राह्य मोहक चित्र.**

**—: या खास अंकाचे मानकरी :—**

(१) स्वामी संजयानंद, हिमालय
(२) श्री. अ. ज. चितांबर, अहमदनगर
(३) प्रा. ए. एम. अमीनगड, गुळूंचे
(४) प्रा. र. श्री. पुजारी, पुणे
(५) डॉ. अनिल जायस्वाल, नागपूर
(६) श्री. मधुकर भीमाशंकर देशपांडे, पुणे
(७) डॉ. श्या. शं. तेंडुलकर, पुणे
(८) श्री. दामोदरपंत खडके, चेंबूर
(९) श्री. चंद्रकांत सामंत, मुंबई
(१०) श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी
(११) श्री. सूर्यकांत गर्जे, पुणे
(१२) कु. पुष्पलता मोहरे, बिलासपूर
(१३) सौ. उषा कर्णिक, अहमदाबाद
(१४) सौ. कमल सांडभोर, पुणे
(१५) श्री. बाळाराम पवार, मुंबई
(१६) श्री. रमेश डी. चव्हाण, धुळे
(१७) श्री. अंबाजीराव सरोदे, दादर
(१८) सौ. अहिल्या उपरकर, माजगाव
(१९) श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर
(२०) श्री. के. रा. धालगावकर
(२१) श्री. काशिनाथ लक्केवार, -इ. इ.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा, (तेलगु) | १–५० |
| (२३) | साई कितनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२४) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२५) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२६) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२८) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, (मराठी व इंग्रजी) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |

Regd. No. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी ११ ते १
सायंकाळी ४.३० ते ६.३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

साईबाबा धर्मार्थ दवाखाना
( शामदासानी फौंडेशन )

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**
ब्लॉक नं. ३, रूम १०४,
लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.

# श्री साईलीला



नोव्हेंबर - डिसेंबर दिवाळी अंक १९७६

किंमत १ · २५ पैसे

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

शिरडी जाहलें पुण्यक्षेत्र ।
बाबांचेनि तें अति पवित्र ।
यात्रा वाहे अहोरात्र ।
येती सत्पात्र पुण्यार्थी । ।२७॥

दाही दिशांसी जयांची साक्ष ।
पटून राहिली प्रत्यक्ष वा परोक्ष ।
साईवेष हा कल्पवृक्ष ।
अवतरला प्रत्यक्ष शिरडीत ॥ २८ ॥

आकिंचन वा संपत्तिमान ।
देखे समस्तां समसमान ।
दावून कांहीं अतर्क्य विंदान ।
भक्तकल्याण साधी जो ॥ २९ ॥

काय ती निःसीम प्रेमलता
नैसर्गिक ज्ञानसंपन्नता ।
तैसीच आत्यंतिक सर्वात्मभावता ।
धन्य अनुभविता भाग्याचा ॥३०॥

कधीं दृढ मौनधारण ।
हेंच जयांचें ब्रह्मव्याख्यान ।
कधीं चैतन्य–आनंदघन
भक्तगण परिवेष्टित ॥ ३१ ॥

–श्रीसाईसच्चरित–अध्याय २२ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे ] नोव्हें.-डिसें. ७६ [ अंक ८-९

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)

● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ १२ ६१

किंमत रु. १·२५

दिवाळी विशेषांक –

# संपादकीय

**दीपांनी उजळल्या दिशा**
**सण हा असे दीपावळी ।**

स. न. वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाचा हा सर्वांगसुंदर असा दिवाळी अंक आमच्या वाचक भक्तांच्या हाती देताना खरोखरीच आम्हास अतीव आनंद होत आहे. हा अंक संपूर्णपणे श्रीसाईभक्तांना भगवान् श्रीसाईबाबांच्या आलेल्या विविध अनुभवांनी गच्च असा भरलेला आहे. गेल्या वर्षी आम्ही असाच भरगच्च अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध केला व काय आश्चर्य, त्या अंकाचे भारतभर सर्वांनी स्वागत केले. दिवाळीच्या सुटीनंतर कार्यालय उघडल्यावर या अंकाची मागणी अनेक साईभक्तांनी व साईप्रेमी नसलेल्यांनीही केली होती पण कार्यालयात आमच्या नेमक्या पाच बांधणीच्या प्रती सोडता एकही प्रत शिल्लक राहिली नाही ही सत्य परिस्थिती, त्यामुळे आम्ही कुणाचीही मागणी पुरवू शकलो नाही याचे आम्हाला अतिशय वाईट वाटले, आणि म्हणून यंदा आम्ही भक्तांची तशी गैरसोय होऊ नये म्हणून आगाऊ आपली प्रत राखून ठेवण्याची सूचना यापूर्वीच केली आहे. गतसाली बंगलोरहून एक साईभक्त महिला केवळ अंकासाठी आल्या होत्या. त्यांना आम्ही मोठ्या नाईलाजाने लेखक-कवींची मजकुराची कात्रणे काढून शिल्लक पाने असलेला अंक दिला होता याची आम्हाला जाणीव आहे. श्रीसाईभक्त साईलीलेचे सर्वत्र कौतुक करीत आहेत, स्वागत करीत आहेत, हेच या अंकाच्या गडप होण्यामागील रहस्य होय.

प्रस्तुत विशेषांक आम्ही मोठ्या भक्तिभावाने वाचकांच्या हाती देत आहोत. अंक योग्यवेळी छापून तो प्रसिद्ध करणे अत्यावश्यक असल्यामुळे ठराविक मुदती-पर्यंतच आलेल्या लेखांचा अंतर्भाव या अंकात करणे शक्य झाले आहे. ज्यांचे लेख उशिरा आले आहेत व छापण्यास योग्य असे आहेत, त्यांना यथावकाश प्रसिद्धी दिली जाईल. ज्यांचे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आलेले आहेत त्या सर्वांनी आम्हांस केलेल्या सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहोत. श्रीसाईलीलेवर त्यांनी असाच लोभ यापुढेही ठेवून सर्व अंगीकृत कार्यक्रमास सहकार्य द्यावे हीच प्रार्थना !

●